Shriniwas Hemade, hodphilosophy@sangamnercollege.org, +91+9226563052

# Philosophy and Good Life

## तत्त्वज्ञान आणि सु- जीवन

### सत्र पहिले : विभाग पहिला

### सुजीवनविषयक विविध दृष्टिकोन
### (Perspectives on Good Life)

घटक 1 : मानवी जीवनाच्या संदर्भात तत्त्वज्ञानाची प्रस्तुतता.

1.1. सॉक्रेटीसची भूमिका : '' अपरीक्षित जीवन जगण्यायोग्य नाही ''
1.2. तत्त्वज्ञानाची चिकित्सक आणि प्रश्न उपस्थित करणारी वृत्ती
1.3. तत्त्वज्ञानाचा समग्रवादी अवलोकनात्मक दृष्टिकोन : प्रज्ञानाची भूमिका
1.4. दर्शन

------------------------------------------------------------------------------------------

## Unit 1: Relevance of Philosophy for Human Life

### घटक 1 : मानवी जीवनाच्या संदर्भात तत्त्वज्ञानाची प्रस्तुतता.

प्रस्तावना -

इतर सर्व सजीव प्राण्यांप्रमाणे माणूसही आपल्या अस्तित्वासाठी झगडतो. कुठल्याही जाणीवेशिवाय आणि हेतूखेरिज निम्नदर्जाचे प्राणी कमी जास्त प्रमाणात आंधळेपणानेच झगडत असतात आणि जैविक प्रेरणेनेच जगत असतात. माणूस मात्र या झगड्याचे स्वरुप समजावून घेतो.त्यासाठी त्याला लाभलेल्या बुध्दिच्या श्रेष्ठ देणगीचा उपयोग करुन घेतो.या झगड्यात यशाचीच प्राप्ती होईल,असे पाहतो. त्यासाठी झगड्याचा आराखडा बनवितो आणि युध्दाच्या साधनांची रचना करतो.आपल्या भोवतालचे जग आणि स्वत:विषयीच्या ज्ञानाच्या प्रकाशात जीवन जगण्याची इच्छा धरतो.आपल्या कृतीच्या तात्काल परिणामांपेक्षा त्यांच्या दीर्घ पल्ल्याच्या फळांची अपेक्षा धरुनच तो कृती करतो.म्हणूनच माणसाची ज्ञानाची इच्छा माणसाच्या बुध्दिमान असण्याच्या स्वभावातून निर्माण होते.त्याच्या समर्थनीय इच्छांचे समाधान करण्याच्या प्रयत्न म्हणजेच तत्त्वज्ञान होय.म्हणूनच तत्त्वज्ञान हा केवळ बुध्दिविलास बाब नाही आणि तात्त्विक कृती या व्यावहारिक चैनबाजी नाहीत तर मूलभूत गरजेच्या गोष्टी आहेत.

ग्रीक - पाश्चात्यांच्या मते ''*तत्त्वज्ञान म्हणजे प्रज्ञानाचे प्रेमिक असणे होय.*'' माणसाचे स्वरूप मूलत: वासनामय असले तरी माणूस बुध्दिमान, विवेकशील प्राणी म्हणून विकसित झाला आहे.तत्त्वज्ञान हे मानवी विकसनाचे शिखर आहे. मानवी जीवनमान सतत उंचावत ठेवण्यासाठी प्रत्येक समाजगटाला चिकित्सा करावीच लागते. चिकित्सा केल्याशिवाय जगणे, हे प्राण्याच्या पातळीवरील जगणे आहे.ही चिकित्सा करणारे तत्त्वज्ञान हे

Department of Philosophy, Sangamner College, Sangamner

*Shriniwas Hemade, hodphilosophy@sangamnercollege.org, +91+9226563052*



एकमेव वस्तुनिष्ठ विज्ञान आहे.म्हणून प्रत्येक समाजगटाला तत्त्वज्ञानाची गरज असते.असे चिकित्सक तत्त्वज्ञान संस्कृतीचा मूलाधार असते. म्हणूनच तत्त्वज्ञानाचा अभ्यास समाजोपयोगी असतो.

बर्ट्रांड रसेल यांचे मत लक्षात घेता *तत्त्वचिंतन हे मनाचे अन्न आहे*.शरीराच्या अन्नाप्रमाणे मनालाही अन्न पुरविले पाहिजे.कारण माणूस शरीर आणि मन अशा दोन घटकांनी बनलेले आहे.शिवाय या मतात बदल करावा, अशी स्थिती कधी उद्‌भवणारही नाही. हे अन्न मिळविण्याचा प्रयत्न माणूस सतत करीत असतो. तत्त्वचिंतन हे मनाचे अन्न असून ते अन्न निर्माण करणे,त्याचा पुरवठा करणे,मन सतत जागृत, चिंतनशील, संवेदनशील ठेवणे यासाठी तत्त्वचिंतन करावे , ही ग्रीक- पाश्चात्य तत्त्ववेत्त्यांची कल्पना आहे.

विज्ञान व तंत्रज्ञानाची कितीही प्रगती झाली तरी तत्त्वज्ञान त्या त्या कालखंडात नेहमीच अटळ, अनिवार्य व प्रस्तुत असते.कोणतीतरी किमान एखादी तरी सुव्यवस्थित,समाधानकारक,तार्किक समर्थन देता येईल अशी तात्त्विक विचारप्रणाली न स्वीकारता जीवन जगता येणे शक्यच नसते.त्यामुळे तत्त्वज्ञान नेहमीच प्रस्तुत असते.

’ भारतीय तत्त्वज्ञान ’ ही तर अतिसमृध्द संकल्पना आहे.कारण जगातील कोणत्याही देशात न घडलेली घटना भारतात घडलेली आहे.ती म्हणजे या एका देशाने जगाला मुख्यत : तीन धर्म व त्यांची स्वतंत्र तत्त्वज्ञाने दिली. हे धर्म म्हणजे हिंदू,बौध्द,जैन.या तीनही धर्मातील तात्त्विक विचारांना ’दर्शन’ असे नाव असून त्यांची परस्परावलंबी रचना म्हणजेच ’ भारतीय दर्शनशास्त्र ’ किंवा ’भारतीय तत्त्वज्ञान’ होय.शिवाय या तीनही धर्माच्या छायेत आणखी एक महत्वाचा धर्म तीनशे वर्षांपूर्वी उदय पावला.तो शिखधर्म होय.या धर्मातील तात्त्विक विचारांची मांडणी विसाव्या शतकात नव्याने केली जात आहे.

## धर्मांची प्रयोगशाळा : धर्मनिरपेक्षतावाद

भारतात प्राचीन कालापासून हिंदु, बौध्द व जैन असे प्रमुख धर्म आहेत.त्यात तीनशे वर्षांपूर्वी शिख या नव्या धर्माची भर पडली. त्याशिवाय नवव्या शतकापासून अनेक धर्मीय भारतात आले. ते येथे राहिले.हे नवे धर्म स्थिरावले.त्यांचा प्रसार झाला. ईस्लाम, ख्रिस्ती,ज्यू, इत्यादी धर्म आज भारतात आहेत. अशा रितीने भारत हा एकमेव देश असावा की जेथे सर्व धर्मीय लोकांची वस्ती आहे.एका अर्थाने भारत ही धर्मांची प्रयोगशाळाच आहे, असे म्हणता येईल. त्यामुळेच येथील धर्मनिरपेक्षतेला सुध्दा खास भारतीय अर्थ आहे, जागतिक विद्‌वान जो अर्थ लावतात, तो येथे लावता येईलच, असे नाही.या सर्वांना घेवूनच भारतीय सुजीवनाचा अर्थ शोधावा लागेल.

पााश्चात्य आणि भारतीय अशा या दोन्ही तात्त्विक विचारप्रवाहांमध्ये मुख्यत: मानवी जीवन आणि जीवनमान (The Life and Standard of The Life ) यांचा विचार करण्यात आला आहे.हे जीवनमान नीतियुक्त व पवित्र कसे राहिल, याकडे खास करून लक्ष दिले पाहिजे, असा आग्रह धरला गेला आहे.मानवी जीवनाचा परिघ विस्तारून मानवेतर प्राणी आणि निसर्ग यांचाही ’जीवन आणि जीवनमान ’ या संकल्पनेत समावेश करणे आवश्यक आहे, अशी जाणीव नव्याने विकसित करण्यात आली. प्राणी आणि निसर्ग हे दोन घटक म्हणजे मानवी जीवनाचा अनिवार्य संदर्भ असून जीवनमान उंचावण्याच्या प्रक्रियेत प्राणी आणि निसर्गाचे संरक्षण आणि संवर्धन यांचाही विचार अत्यावश्यक आहे, असा गेल्या शतकापासून मांडण्यात येत आहे.

मानवी जीवनाचा दर्जा उंचावणे म्हणजेच नैतिकदृष्ट्या ते शुभ जीवन करणे,सु-जीवन बनविणे होय. म्हणून सुजीवनाची संकल्पना विकसित झाली. जीवन कसे शुभ होईल, यासाठी केवळ चांगले वर्तन करणे पुरसे नाही, तर त्या चांगल्या वर्तनाला नैतिक,तात्त्विक व तार्किक अधिष्ठान देणे आवश्यक आहे.तसे युक्तिवाद सिध्द केले पाहिजेत.यावर्षी अशाच काही युक्तिवादांचा अभ्यास आपण करणार आहोत.

Department of Philosophy, Sangamner college Sangamner


*Shriniwas Hemade, hodphilosophy@sangamnercollege.org, +91+9226563052*



सॉक्रेटीसने उपस्थित केलेले प्रश्न, त्याची विचार करण्याच पध्दती, त्यातूनच विकसित झालेली तत्त्वज्ञानाची चिकित्सक वृत्ती,तत्त्वज्ञानाचा व्यापक दृष्टिकोन, प्रज्ञाची भूमिका आणि भारतीय संदर्भात *'दर्शन'* या संकल्पनेचे योगदाना या मुद्द्यांच्या आधारे हे युक्तीवाद तपासता येतील.

## 1.1 सॉक्रेटीसची भूमिका : ' परीक्षण न केलेले जीवन जगण्यायोग्य नाही '

सॉक्रेटीस
(इ.स.पू.469- 399)
An enigma !
Classical Greek Athenian Philosopher.
One of the founders of Western philosophy



सॉक्रेटीस (इ.स.पू. 469 ते 399) हा प्राचीन ग्रीक तत्त्वज्ञ ग्रीक -पाश्चात्य तत्त्वज्ञानाचा मुगुटमणी समजला जातो.विल्यम फ्रॅंकेना यांनी सॉक्रेटीसचा गौरव ' *नैतिक तत्त्वज्ञानाचा पालक संत*[1] या शब्दात केला आहे तर '' *सॉक्रेटीस हा संत आणि तत्त्वज्ञानाचा हुतात्मा आहे* '' असा गौरव ॲथंनी गॉटलिएब [2] यांनी केला आहे.

सॉक्रेटीस प्राचीन ग्रीसमधील अथेन्स शहराचा रहिवासी होता.त्याचे वडिल सोफ्रॉनिकस्कस हे मूर्तिकार आणि आई फेनॅरिटी ही परिचारिका (सुईण) असावी.वरकरणी दिसायला अत्यंत सामान्य आणि जवळपास अर्धपशू असणारा सॉक्रेटीस अत्यंत नीतिवान, नि:स्वार्थी,विनम्र व प्रसन्न व्यक्तिमत्वाचा होता.त्याला ईश्वरी संदेश येत असत, असा त्याचा दावा होता.

सॉक्रेटीसने स्वत:च्या जीवनाविषयी आणि तत्त्वज्ञानाविषयी काहीही लिहून ठेवलेले नाही.[3] त्याच्या शेवटच्या कालखंडात त्याला प्लेटो (इ.स.पू.431 ते 351) हा सर्वोत्तम शिष्य लाभला.प्लेटोने त्याचे सारे तत्त्वचिंतन नाट्यमय संवादरुपात लिहिले.अशा किमान 36 संवादांची[4] नोंद करण्यात आली असून यांनाच Dialogues म्हणतात.गुरुला श्रध्दांजली म्हणून त्याने आपल्या साऱ्या संवादांमध्ये प्लेटोने सॉक्रेटीसला मध्यवर्ती स्थान दिले. युथिफ्रो(Euthyphro), क्रिटो(Crito),ॲपॉलॉजी(Apology) आणि फिडो (Phaedo) अशा चार प्रमुख संवादांमधून खऱ्या सॉक्रेटीसचे दर्शन प्लेटोने घडविलेले आहे.प्लेटोबरोबरच झेनोफोन (इ.स.पू. 430 ते 354), ॲरिस्टोफेनीस (इ.स.पू. 440 ते 380) आणि ॲरिस्टॉटल (इ.स.पू.384 ते 322) यांच्या लेखनातून

[1]विल्यम फ्रॅंकेना ' *एथिक्स* ' दुसरी आवृत्ती पान 2 प्रेंटीस हॉल ऑफ इंडिया, नवी दिल्ली 2001

[2]ॲथंनी गॉटलिएब - *दी ग्रेट फिलॉसॉफर्स : फ्रॉम सॉक्रेटीस टू ट्यूरिंग* ' संपादक - रे मॉक आणि फ्रेडरिक राफेल ' फिनीक्स पेपरबॅक,पान 07 2000

[3]अर्थात सॉक्रेटीसने कारावासात असताना काही कविता केल्या असाव्यात; तसेच अपोलो देवाची प्रार्थना आणि इसाप या चतुर माणसाच्या कहाण्यांचे सॉक्रेटीसने कवितेत रूपांतर केले होते म्हणतात. पण दुदैवाने हे लेखन उपलब्ध नाही : ' नॉर्मन मेलशेट ' *दि ग्रेट कॉन्व्हर्सेशन* ' पान 59 पाचवी आवृत्ती 2007 ऑक्सफर्ड युनिर्व्हसिटी प्रेस.

[4]फ्रेडरिक कोपलस्टन, ' *हिस्ट्री ऑफ फिलॉसॉफी* ', पान 133

Department of Philosophy, Sangamner

Shriniwas Hemade, hodphilosophy@sangamnercollege.org, +91+9226563052

सॉक्रेटीसची माहिती मिळते.अथेन्समधील तरुणवर्गाशी संवाद साधून सॉक्रेटीस त्यांना तत्त्वचिंतनाचे धडे देतो.तत्त्वज्ञान जगणे म्हणजेच तत्त्वज्ञानाची निर्मिती करणे, आणि त्यानुसार जीवन आचरणे असते; असे प्रशिक्षण सॉक्रेटीसने या संवादांमधून दिले आहे.

सॉक्रेटीसपूर्व कालात ज्यांनी तात्त्विक विचार मांडले त्यांना सोफिस्ट तत्त्वज्ञ म्हणतात.सोफिस्टांनी मांडलेल्या तत्त्वज्ञानामुळे काही गंभीर परिस्थिती उद्भवली होती. सॉक्रेटीसचे विचार मुख्यत: या विचारवंतांच्या विचारांचे खंडन करण्यातून आले. त्यासाठी प्रथम सोफिस्ट काय म्हणतात ते थोडक्यात पाहू.



## सोफिस्टांचे तत्त्वज्ञान

सोफिस्टांच्या मते ज्ञानाचे साधन केवळ इंद्रीये हीच असून सर्व ज्ञान इंद्रियांमार्फतच होणारे असते. ज्ञान होते याचा अर्थ इंद्रियांमार्फत *संवेदना* मिळतात. वेगळ्या भाषेत ज्ञान केवळ संवेदनांचेच असते.आणि संवेदनांचा विषय केवळ भौतिक जग हेच आहे.म्हणूनच व्यक्तीगत पातळीवर माणसाला मिळणारे इंद्रियसुख हेच ज्ञानाचे मुख्य विषय आहेत.तेच जीवनात महत्वाचे असतात.त्यांच्या मते ज्ञान बुध्दिने अथवा विवेकशक्तीने होवू शकत नाही.'सत्याचे ज्ञान ' अशी काही संकल्पनाच नसते, असेही सोफिस्टांचे म्हणणे होते.

सोफिस्टांवर सॉक्रेटीस कडक टीका करतो.त्याच्या मते सोफिस्ट ज्याचे गुणगान गातात ते जग ही सतत बदलणारी वस्तू आहे. साहजिकच जगाचे ज्ञानही बदलत राहते. ज्ञान चंचल,सतत बदलत असल्याने नेमके कशाचे ज्ञान होत आहे,हे सांगणे शक्य होत नाही.त्या ज्ञानाला ज्ञानाचा दर्जा प्राप्त होवूच शकत नाही.मग ते निसर्गाचे असो की मानवी समाजाचे, मानवी मूल्यांचे असो, ते सत्यज्ञान असू शकत नाही.शिवाय भौतिक जग इतके अमर्याद आहे की त्याचे ज्ञान माणसाला होणे जवळपास अशक्यच असते.त्यामुळे त्यामागे धावणे चुकीचे आहे.

दुसरे असे की संवेदनांमार्फत मिळणारे इंद्रियसुख क्षणभंगुर असते.ते वासना सतत निर्माण करीत राहते.त्यातूनच व्यक्ती व समाज अनैतिक वर्तन करतात. शोषण, विषमता, अन्याय यांचा उगम इंद्रिय सुखातूनच होतो.याचाच अर्थ ज्ञानाची सोफिस्टांची कल्पना समाजात दुर्गुण पसरविते.अनाचार माजविते.

थोडक्यात सोफिस्ट तत्त्वज्ञांनी मांडलेल्या तत्त्वज्ञानामुळे सामाजिक अराजक माजले होते.लोकशाहीचा चुकीचा अर्थ लावला जावून अनैतिकताच पसरली होती.लोकशाही काही मूठभर धनिकांच्या हातचे खेळणे बनली होती.लोकशाहीची संकल्पना संकुचित व मर्यादित होती. 'सत्य' या संकल्पनेविषयीचे अज्ञान आणि चुकीची व दिशाभूल करणारी ज्ञानाची संकल्पना, हेच अथेन्समधील तत्कालिन सर्व प्रकारच्या सामाजिक आणि राजकीय जीवनातील अराजकाचे कारण होते. त्यामुळे *कोणतेही नवे तत्त्वज्ञान निर्माण करण्यापेक्षा सत्यविषयक प्रेम लोकांमध्ये कसे निर्माण होईल आणि त्यांना योग्य जीवन जगता यावे यासाठी कोणते मार्गदर्शक तत्त्व शोधता येईल हीच सॉक्रेटीसपुढील समस्या होती.*

या समस्येवर त्याने उत्तर शोधले : '*सत्य म्हणजेच सद्‌गुण*'. त्यासाठीच तो ज्ञानाची सांगड नीतीशी घालतो.तो म्हणतो, "ज्ञान म्हणजेच सद्‌गुण" त्याची ही भूमिका प्रामुख्याने 'ॲपॉलॉजी' या भाषणात तो मांडतो.ते ज्ञान मिळविण्याची पध्दतीही त्याला द्यावयाची होती. ती म्हणजेच *सॉक्रेटीसची पध्दती* होय.

या संदर्भात सॉक्रेटीसची पुढील दोन मते[5] महत्वाची मानली जातात.

[5] ही दोन मते एकाच नैतिक भूमिकेवर आधारलेली आहेत. साधारणपणे आधी ' ज्ञान म्हणजे सद्‌गुण ' हे मत येते आणि नंतर 'अपरीक्षित जीवन जगण्यायोग्य नाही ' हा सिध्दान्त सिध्द होतो. सॉक्रेटीसचे विचार या क्रमाने विकसित झाले आहेत.

Department of Philosophy, Sangamner College, Sangamner

*Shriniwas Hemade, hodphilosophy@sangamnercollege.org, +91+9226563052*



1) ''सद्‌गुण म्हणजे ज्ञान '' *( Virtue is Knowledge )*
2) ''परीक्षण न केलेले जीवन जगण्यायोग्य नाही'' *( The unexamined life is not worth living )*


आपण येथे दुसरे मत आधी पाहू .

## परीक्षण न केलेले जीवन जगण्यायोग्य नाही

सॉक्रेटीसवर 70 व्या वर्षी दोन आरोप ठेवून खटला [6] भरण्यात आला. ते आरोप असे :

(1) ''राज्यसंस्था ज्या देवांची पूजा करते ते देव सॉक्रेटीस नाकारतोच पण स्वत:चे नवीन आणि अपरिचित धार्मिक विधी तो प्रसारीत करतो. ''

(2) '' सॉक्रेटीस राज्यातील तरूणांना बिघडवितो. ''



आरोप करणाऱ्या फिर्यादीनी त्याला देहदंड द्यावा, अशी मागणी केली.ती मान्य झाली.या खटल्याची हकिकत व सॉक्रेटीसचे अंतिम भाषण प्लेटोने *' ॲपॉलॉजी [7]'* (समर्थन ) या संवादात आणि विषप्राशनाची कथा *' फिडो '* या संवादात दिली आहे.

Department ... College, Sangamner

---

[6] हा खटला मेलेटस या नागरिकाने भरला होता.त्याला ब्लिकॉन या दुसऱ्या नागरिकाचा पाठिंबा होता.पण खटल्याचा खरा सूत्रधार ॲनिटेस हा राजकारणी व्यापारी होता.अथेन्सच्या तत्कालिन कायद्यानुसार आरोपीला कोणती शिक्षा द्यावी, हे ठरविण्याचा अधिकार फिर्यादीनांच होता.ती कडक असेल तर आरोपी सौम्य शिक्षेची मागणी करु शकत असे.त्यावर पंचांचा निर्णय अंतिम मानला जात असोंचांची संख्या 500 असावी.त्यापैकी 280 जणांनी सॉक्रेटीसच्या विरुध्द आणि 220 जणांनी बाजूने कौल दिला. .यावेळी अथेन्समध्ये लोकशाही होती.कोपल्स्टन -*हिस्ट्री ऑफ फिलॉसॉफी* पान 115

[7] Apology हे ग्रीक शब्द *apologia* चे लिप्यंतर ( transliteration ) आहे, भाषांतर ( translation ) नाही. *apologia* चा अर्थ समर्थन करणे, स्वतःची बाजू मांडणे.

Shriniwas Hemade, hodphilosophy@sangamnercollege.org, +91+9226563052



सॉक्रेटीसने खटल्याच्या उत्तरादाखल प्रदीर्घ भाषण केले. तत्त्वचिंतनाने संपृक्त अशा या भाषणावरुन त्याचा तत्त्वज्ञानाकडे पाहण्याचा आणि तत्त्वज्ञानाचा व्यावहारिक दैनंदिन उपयोग कसा करता येईल याकडे लक्ष देण्याचा दृष्टिकोन समजतो. या खटल्यात स्वत:चे म्हणणे मांडताना त्याने केलेले विधान म्हणजे, -
*''अपरीक्षित जीवन जगण्यायोग्य नाही ''.*

पळून जाण्याचा, गप्प बसण्याचा अथवा आमरण कारावासाचा पर्याय निवडता येईल आणि जीव वाचविता येईल,असे सॉक्रेटीसला सुचविण्यात आले होते.तेंव्हा कोणताही पर्याय निवडला तरी जीवनातील सर्वात उपयुक्त गोष्ट त्याच्यापासून हिसकावून घेतल्यासारखे होईल, असे सांगून नकार दिला.यावेळी त्याने स्पष्टपणे सांगितले की जगाचे परीक्षण करणे आणि जग जे जगण्यासाठी आणखी कसे चांगले करता येईल, हे पाहणे हा सद्‌गुण हीच एकमेव उपयुक्त गोष्ट आहे ! सॉक्रेटीस म्हणतो *"जगण्याचे परीक्षणच केले नाही तर ते जीवन जगण्यालायच असू शकत नाही."*[8] तो सत्यज्ञानाशी ठाम राहिला. अखेर त्याला देहांताची शिक्षा सुनावण्यात आली. त्याला हेमलॉक नावाचे विष पिण्याची शिक्षा देण्यात आली.

या संदर्भात सॉक्रेटीसने 'ज्ञान' म्हणजे जीवनाचे परीक्षण अशीही भूमिका मांडली. या संदर्भात त्याची दोन विधाने प्रसिध्द आहेत.

*" अन्याय करण्यापेक्षा अन्याय सहन करणेच अधिक योग्य असते "*

*"जीवन अथवा मृत्यू यापैकी कुठेही चांगल्या माणसाला दु:ख देता येत नाही "*

सॉक्रेटीसच्या मते मानवी जीवन सुफल व शुभ होण्यासाठी परीक्षण आवश्यक आहे.हे परीक्षण दोन रितीने करता येते.आत्मपरीक्षण आणि समाजपरीक्षण. 'ओळखणे' हीच त्याची पध्दती आहे. स्वत:ला ओळखता यावे यासाठीच माणसाने आपले परीक्षण केले पाहिजे. इतरांच्या परीक्षणासाठी सॉक्रेटीक पध्दती वापरता येते. थोडक्यात परीक्षणासाठी सॉक्रेटीस दोन पध्दती उपयोगात आणतो.

(1) आत्मपरीक्षणासाठी 'स्वत:ला ओळखा' ( Know thyself )[9] ही पध्दती.
(2) इतरांना ओळखण्यासाठी किंवा त्यांना त्यांची ओळख पटवून देण्यासाठी संवाद पध्दती.

जेव्हा इतरजणांना त्यांचे अज्ञान जाणवेल तेंव्हा ते आत्मपरीक्षणाकडे वळतील. मग त्यांच्या अंतरंगात सत्यज्ञानाचा उदय होईल. हेच त्यांचे तात्त्विकीकरण आहे. ते तात्त्विकीकरण करणे याचा अर्थच तत्त्वज्ञान निर्माण करणे असते. ( to do philosophy is philosophizing in itself ) स्वत:ला ओळखा' आणि 'जीवनाचे परीक्षण करा' ह्या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत.

थोडक्यात, सोफिस्टांनी निसर्गाचे ज्ञान महत्वाचे मानले.पण सॉक्रेटीसच्या मते निसर्ग ज्ञानापेक्षा मानवी समाज व मानवी मूल्यांवर आधारित समाजाची रचना हीच मूलत: महत्वाची बाब मानली पाहिजे. सॉक्रेटीसच्या इ

Department of Philosophy, Sangamner College, Sangamner

[8] " माणसाने रोजच सद्‌गुणांची चर्चा करावी, यातच त्याचे सर्वोत्तम कल्याण आहे. आणि माझे तसेच इतरांचे परीक्षण करताना मी ज्या ज्या गोष्टींवर चर्चा करीत होतो त्या सार्‍यांवर चर्चा करणे यात कल्याण आहे, कारण जगण्याचे परीक्षणच केले नाही तर ते जीवन जगण्यालायच असू शकत नाही." सॉक्रेटीस : ॲपॉलॉजी 38 a

[9]हे वचन मुळात सॉक्रेटीसपूर्व प्राचीन ग्रीक तत्त्वज्ञ ' लॅसिडिमॉनचा चिलॉन ' याचे आहे.प्राचीन ग्रीसमध्ये *'सात शहाणे'*या नावाने ओळखले जाणारे सात तत्त्वज्ञ होते.चिलॉन त्यापैकी एक होता.हेच वचन डेल्फीच्या मंदिरावर कोरलेले होते.तेच नंतर सॉक्रेटीसच्या नैतिक तत्त्वज्ञानाचे मूळ स्त्रोत बनले.

Shriniwas Hemade, hodphilosophy@sangamnercollege.org, +91+9226563052



ानाचे विषय व्यावहारिक आचरण = सदाचरण, राजकारण, नीति आणि कला हे मानवी जीवनातील थेट विषय होते. त्यामुळेच *'सॉक्रेटीसने तत्त्वज्ञान स्वर्गातून पृथ्वीवर आणले*[10] *'* असे म्हंटले जाते.

सॉक्रेटीसवर त्याच्या आईचा विशेष प्रभाव असावा.त्याची आई सुईणीचे काम करी. सुईण मूल निर्माण करीत नाही पण स्त्रीच्या पोटात असेलेले मूल नीटपणे सुरक्षितपणे जगात प्रवेश करावे, याचा ती प्रयत्न करते. सॉक्रेटीसच्या मते विचारांच्या क्षेत्रातील तो सुईणच आहे.'' लोकांना प्रश्न विचारून त्यांच्या मनातील विचार बाहेर काढण्याचे काम मला देवानेच दिले आहे.मी देवाने पाठविलेली गोमाशी आहे.गोमाशी जशी प्राण्यांना मुकाट्याने बसू देत नाही.सतत स्वच्छता करण्याचे काम करण्यास त्यांना भाग पाडते, तसे देवाने मला लोकांना विचार करण्यास भाग पाडण्यासाठी पाठविले आहे.म्हणून मला ते केलेच पाहिजे. ते न करणे हा देवाचा अपमान होईल, म्हणून मी ते काम आमरण करणारच '' असे तो अॅपॉलॉजीत म्हणतो.

अर्थात लोकांनी विचार करावा, असे सॉक्रेटीसला कितीही मनापासून वाटले तरी वास्तवात लोकांना परीक्षित जीवन जगावे असेच वाटेल, असे नाही.त्यांना चिंतनाला वेळ नाही, असे नाही. पण ते जाणीवपूर्वक टाळत असतात.ते जे काही जगत असतात, त्यातच ते सर्वात समाधानी असतात. प्रश्नांची उत्तरे मिळालीच पाहिजे, असे त्यांना वाटतच नसते.एवढेच नव्हे तर आपणास निदान प्रश्न तरी उपस्थित करता आले आहेत का ? तेवढी तरी संधी आपण जीवन जगताना घेतली की नाही, हे ही ते तपासत नाहीत. आणि तेच तर जगताना महत्वाचे असते.

दु:ख कुणाला टळत नाही.पण या विश्वात माझे स्थान काय आहे ? एवढे जरी विचारले तरी जगण्याची सर्व तत्त्वे आणि घटक यांच्यातील सुसंगती शोधता येते.कुठे जावयाचे आहे, हे माहित असलेल्या दोन माणसांपैकी एकाकडे नकाशा असेल तर कोणाचा प्रवास सुखकर व सुकर होईल ? तर उघडच, 'नकाशा असणाऱ्याचा !! ' तत्त्वचिंतन हा वैचारिक नकाशा आहे. तो नकाशा असणारा सुसंगत विचार करून शुभ जीवनाची आखणी करु शकतो, ते शुभ जीवन आत्मपरीक्षणातून साकारते.म्हणूनच प्रत्येकाने आत्मपरीक्षणासाठी वेळ काढलाच पाहिजे. मूल्यवान जीवनाचा अनिवार्य हिस्सा म्हणून जीवन आणि सद्गुण यांची जाहीर चर्चा केलीच पाहिजे, असे स्पष्ट करताना सॉक्रेटीस हे विधान करतो.

सॉक्रेटीसचे हे चित्र म्हणजे प्लेटोने आपणापुढे आदर्श तत्त्ववेत्त्याचे उभे केलेले चित्र आहे.ज्याला तत्त्वचिंतनात रमावयाचे आहे,सत्याचा शोध घ्यावयाचा आहे, त्याने कसे वागले पाहिजे, याचे चित्रण प्लेटो करतो.त्यानुसारच आपल्या जीवनाचे मूल्य ठरले पाहिजे.

## 1.2. तत्त्वज्ञानाची चिकीत्सक आणि प्रश्नार्थक अभिवृत्ती

चहा पिणे,नाटक पहाणे,पुस्तक वाचणे अथवा सत्तासंपत्ती मिळविणे या भौतिक गोष्टीतून जसा आपणास आनंद मिळतो तसा सत्याचा शोध करण्यातूनही आनंद मिळतो.सत्य, मग तो कोणत्याही प्रकारचे असो, प्राप्त झाले की सत्यशोधकाला आनंद मिळतो. दैनंदिन जीवनात प्रत्येकजण कोणत्या ना कोणत्या प्रकारच्या सत्यशोधनात गुंतलेला असतो.विद्यार्थि,पत्रकार,संशोधक, वैज्ञानिक इत्याही मंडळी त्यांच्या त्यांच्या क्षेत्रातील सत्य शोधतातच. पण हातगाडीवाला,शेतमजूर,नोकर अथवा कुणीही सामान्य माणूसही जगताना त्याचे त्याचे सत्य शोधत असतोच.त्यातून कदाचित व्यकित्तगत सत्य अथवा सामाजिक सत्य असाही प्रकार येवू शकतो.

काही सत्ये तात्पुरती तर काही अंतिम स्वरुपाची असतात. एखादे सत्य सापडले की हेतू संपतो.मग नव्या सत्याचा शोध सुरु होतो.पण अंतिम सत्य असे असते की जे सापडण्यासाठी दीर्घकाळ लागू शकतो.किंवा मग

[10] हे मत सिसेरो (इ.स.पू. 106 ते 43 ) या प्रख्यात रोमन वक्ता, इतिहासकार, लेखक व राजकीय धुरंधराने व्यक्त केले आहे.

Department Of Philosophy Sangamner College Sangamner

*Shriniwas Hemade, hodphilosophy@sangamnercollege.org, +91+9226563052*



सत्यविषयक तुमची संकल्पना काय आहे किंवा मग ' सत्य म्हणजे काय ? ' हाच एक शोधप्रकल्प ठरतो. सत्यशोधन करणे ही तात्त्विक वृत्ती (Philosophical attitude ) आहे. केवळ तत्त्ववेत्ताच तिला चांगली दिशा देतो ही तात्त्विक वृत्तीच व्यक्तीमध्ये तात्त्विक दृष्टिकोन निर्माण करते. ती जीवनाची अनिवार्य अट असते.

प्रश्न विचारणे, ही महत्वाची आणि मूलभूत अभिवृत्ती आहे.रसेलच्या मते तत्त्वज्ञानात उत्तरांना फारसे महत्व नसते, तर प्रश्नांना महत्व असते.प्रश्नाचे उत्तर मिळाले की त्याचे विज्ञान बनते, मग तत्त्वज्ञानाचा भअग बनत नाही.सतत योग्य प्रश्न विचारणे ही तात्त्विकता होय.जी.ई.मूरने प्रश्नार्थकता ही तत्त्वज्ञानाची पध्दती बनविली होती.त्याच्या मते प्रत्येक गोष्टीवर प्रश्न विचारता येणे शक्य आहे.अर्थात त्याची विशिष्ट रित आहे.

## चिकीत्सक अभिवृत्ती

माणसाने मिळविलेल्या ज्ञानाची व त्याआधारे उभ्या केलेल्या जीवनाची चिकीत्सा करणे आवश्यक आहे.ज्या जीवनाची चिकीत्सा केली जात नाही,ते जीवन जगण्यासाठी लायक नसते, असे सॉक्रेटीसचे मत आहे.ही चिकीत्सा कशी करावी यासाठी तत्त्वज्ञानाचा उपयोग होतो.अशा तत्त्वज्ञानाला 'चिकीत्सक तत्त्वज्ञान (Critical Philosphy) म्हणतात.

विशेषत: राजकीय जीवनात ही तात्त्विक चिकीत्सा अतिशय आवश्यक असते.बहुधा राजकीय पक्ष लोकांना भावनिकदृष्ट्या आवाहन करुनच सत्तेवर येत असतात.पण जनतेने चांगले आणि वाईट यात फरक करायला शिकणे, यात लोकशाहीचे यश असते.त्यासाठी समीक्षा करणे गरजेचे आहे.सॉक्रेटीसचे तेच म्हणणे आहे. कारण ' समीक्षक तत्त्वज्ञान योग्य व चांगला विचार करण्याचे आणि वैचारिक सुसंगती कशी राखावी; त्याचवेळी कसलाही गोधळ कसा टाळावा, याचे प्रशिक्षण जनतेला देते.

## 1.3 तत्त्वज्ञानाचा अवलोकनात्मक दृष्टीकोन : प्रज्ञानाची भूमिका

जगप्रसिध्द तत्त्वज्ञ बर्ट्रांड रसेल (1872-1970) च्या मते 'तत्त्वज्ञान' हा शब्द अनेकार्थी उपयोगात आणला गेला आहे.काही व्यापक तर काही संकुचित अर्थाने त्या शब्दाचे उपयोजन झाले आहे.तत्त्वज्ञान हा शब्द ईश्वरशास्त्र आणि विज्ञान यांच्या 'मध्ये' कुठेतरी येतो.जगातील सर्व प्रश्नांवर निश्चित उत्तर देते ते विज्ञान आणि जिच्यात केवळ आग्रही मते असतात, कुठलेही निश्चित ज्ञान नसते पण लोक ज्यावर विश्वास ठेवू इच्छितात तो प्रांत म्हणजे ईश्वरशास्त्र होय. या दोन्ही ईश्वरशास्त्र आणि विज्ञान यांच्यामध्ये *'एक निर्जन प्रदेश' (No Man's Land)* आहे की ज्यावर सतत वरील दोन्ही बाजूंनी सततच हल्ले होत राहात. हा प्रदेश म्हणजे तत्त्वज्ञान होय, असे रसेलचे मत आहे.[11]

हे विश्व अनेक वस्तू,पदार्थ,घटना,प्राणी आणि व्यक्ति या विविध घटकांनी बनलेले आहे.हे घटक विश्वात केवळ टाकलेले नाहीत.त्यांच्यात काहीएक विशिष्ट स्वरूपाचा कार्यकारणसंबंध आहे,नाते आहे.प्राणी चेतनामय आहेत तर वस्तु,घटना जड आहेत.अंतिम सत्य किंवा कारण जर एकच असेल तर असे परस्परविरुध्द गोष्टी निर्माण कशा झाल्या? त्यांच्यात सुसंगती कशी शोधावी ? मग विश्व चैतन्यमय आहे की जड आहे ? असा प्रश्न पडतो.

शिवाय ज्या विविध गोष्टी आजूबाजूला दिसतात त्यांच्यात काही संबंध आहेत, हे खरेच असते.पण हे संबंध आंतरिक आहेत की बाह्य ? दोन वस्तूंमधील संबंध आणि दोन व्यक्तिमधील संबंध एकच असतो की

---

[11]बर्ट्रांड रसेल - *पाश्चात्य तत्त्वज्ञानाचा इतिहास:रसेलकृत परिचय* : अनुवाद श्रीनिवास हेमाडे परामर्श खंड 19 अंक 3, नोव्हेंबर 1997.

Department Of Philosophy,Sangamner College,Sangamner

*Shriniwas Hemade, hodphilosophy@sangamnercollege.org, +91+9226563052*

भिन्नभिन्न असतो ? उष्णता आणि मेण यांचा संबंध *वितळणे* असा दिसतो.पण उदाहरणार्थ 'अहमदनगर ते मुंबई मार्गे नासिक' हा कसला संबंध आहे ? व्यक्तिमधील प्रेम या संबंधाचे स्वरुप काय ? ते देशप्रेमासारखे , मानवप्रेमासारखेच असते की वेगळेच काही असते ?

प्रत्येक घटनेमागे कारण असते, असे म्हणताना 'कारण' (reason) नावाचे तत्त्व खरेच असते का ? की एकामेकामागे काही घटना घडत असतात एवढेच ? सूर्य मावळणे हे सूर्य उगवण्याचे कारण आहे का ? की कारण ही आपली व्यक्तिगत भावना आहे ?

अशा विविध प्रकारच्या परस्परविरोधी गोष्टींकडे व्यापक दृष्टिकोनातून पाहणे, त्यांचे अवलोकन करणे हेच तत्त्वज्ञान होय. ते चिकीत्सेतून शक्य होते.म्हणून तत्त्वज्ञान चिकित्सक असते.ही चिकीत्सा करणे हे मानवी प्रज्ञानाकडून पार पाडली जाणारी भूमिका आहे.



## 1.4 दर्शन :

स्थूलमानाने दर्शन म्हणजे तत्त्वज्ञान.जगातील प्राचीन संस्कृतींनी जी अतिशय संपन्न व आशयसमृध्द तात्त्विक परंपरांची निर्मिती केली त्यास एक दर्जेदार,भारदस्त,आब राखणारा व काहीसा दरारा निर्माण करणारा शब्द म्हणजे तत्त्वज्ञान.दर्शन,तत्त्वज्ञान आणि Philosophy हे तिन्ही शब्द पर्यायी भाषांतर म्हणून वापरले जाणारे शब्द आहेत. त्यातील 'दर्शन ' चा अर्थ पाहू :

संस्कृतमधील 'दृश्' या धातूपासून दर्शन ही संज्ञा बनते. दर्शनचा मूलार्थ दृष्टि.[12] दृश् म्हणजे पाहाणे. दृश्य म्हणजे जे दिसते ते किंवा पाहण्याचा विषय. दार्शनिक (द्रष्टा) म्हणजे पाहणारा आणि दर्शन म्हणजे पाहण्याची क्रिया. दर्शनचे दोन अर्थ स्पष्ट करता येतील.

1. समग्र अस्तित्व हे एक गूढ आहे, हे जाणून त्याकडे मर्मभेदकतेने पाहाणे, त्याचे स्वरूप आणि त्याच्याशी असलेले माणसाचे नाते जाणणे.
2. प्राचीन भारतीय ऋषींची अशी धारणा होती की मंत्र त्यांना प्रत्यक्ष दर्शन देत असत *( ऋषिर्दर्शनात् )*[13] . अशा मंत्रानी खुद्द ऋषींपुढे अवतरणे, प्रगट होणे म्हणजे दर्शन.

यातील पहिला अर्थ विश्लेषणात्मक असून भारतीय परंपरेसह पाश्चात्य परंपरेलाही कवेत घेणारा तो महत्वाचा मुद्दा आहे.दुसरा अर्थ खास भारतीय आहे.योग्य अधिकारी साधकापुढे ' तात्त्विक विचार स्वत:हून प्रगट होवून त्यास दर्शन देतात ', अशी भारतीयांची श्रध्दाच होती.

अर्थात अमूर्त विचारांना भौतिक वस्तूसारखे अस्तित्व नसताना ते कसे प्रगट होतील ? ' असा प्रश्न न विचारता त्या भूमिकेमागील चिंतकऋषींच्या सत्याविषयीच्या भावनिक तीव्रतेचा व उत्कटतेचा आदर राखून तो अर्थ स्वीकारणे योग्य होईल.तात्त्विक विचारांचा दर्जा सामान्य विचारापेक्षा वेगळा असतो,असे त्यांना लक्षात आणून द्यावयाचे आहे , याची नोंद घेतली पाहिजे एवढेच.

भारतीयांचे प्रयत्न तात्त्विक विचारांमार्फत अंतिम सत्याचे केवळ अप्रत्यक्ष ज्ञान व्हावे ; यासाठी नव्हता तर त्यांचे 'साक्षात दर्शन' व्हावे यासाठी होता ! 'चक्षुर्वै सत्यम्' चा हा अर्थ आहे.म्हणूनच आत्मा किंवा ब्रह्म यांचे दर्शन

[12] बौध्द तत्त्वज्ञानात दर्शन या संज्ञेला ' दिठ्ठी ' असे म्हंटले आहे.
[13] र.प.कंगले *सर्वदर्शनसंग्रह* पान 1 - महाराष्ट्र राज्य साहित्य मंडळ प्रथमावृत्ती 1985

Department of Philosophy, Sangamner College, Sangamner

*Shriniwas Hemade, hodphilosophy@sangamnercollege.org, +91+9226563052*



म्हणजे 'आध्यात्मिक अनुभव' असे उपनिषदे म्हणतात. या पातळीवर विचारांचे दर्शन हे केवळ 'बघणे' उरत नाही तर द्रष्ट्याने 'स्वत:च तो विचार होणे ' असते.हा 'अहं ब्रह्मास्मि' चा साक्षात्कार असतो.[14]

भारतीय तत्त्वज्ञान विविध विचारधारांमध्ये किंवा विचारप्रणालींमध्ये विभागले गेले आहे. या प्रणालींनाच 'दर्शन' असे नाव आहे.त्यांनाच इंग्रजीत System असे नाव आहे. ते अर्थातच दिशाभूल[15] करणारे आहे. त्यामुळे भारतीय तत्त्वज्ञान असे न म्हणता 'भारतीय दर्शने' किंवा 'भारतीय दर्शनशास्त्रे' म्हंटले पाहिजे.जसे वेदान्त द्र्शन, योग दर्शन इ. येथे दर्शन म्हणजे दृष्टिकोन.

समग्र वस्तुस्थितीचे नेमके स्वरूप काय आहे ? या वस्तुस्थितीचे ज्ञान कोणत्या प्रमाणांनी म्हणजे साधनांनी होवू शकेल ? मानवी जीवनाची इतिकर्तव्यता कशात सामावलेली आहे ? मानवी जीवनाचे अंतिम ध्येय कोणते ? ते साध्य प्राप्त करून घेण्याचा मार्ग कोणता ? या साऱ्याविषयीचा समग्र दृष्टिकोन म्हणजे दर्शन होय.अशा विविध दृष्टिकोनांची चर्चा ज्यात केली जाते ते शास्त्र म्हणजे दर्शनशास्त्र होय.भारतीय तत्त्वज्ञानाची माहिती देणारी शास्त्रे ती दर्शनशास्त्रे होय. दर्शनशास्त्रे म्हणजे तत्त्वज्ञान असेही समीकरण झाले.त्याचे कारण तत्त्वज्ञान म्हणजे तत्त्वांचे ज्ञान असे समीकरण आहे. त्यामुळेच *"तत्त्वज्ञानसाधनशास्त्रदर्शनम्"* असे म्हंटले आहे.

भारतात तत्त्वज्ञानाचा अभ्यास आणि विकास दर्शनांच्या म्हणजे तात्त्विक प्रणालीच्या माध्यमातून झाला.पाश्चात्य तत्त्वज्ञानाचा विकास असा दर्शनाच्या माध्यमातून झाला नाही.त्यामुळे दर्शनशास्त्र हा शब्द भारतीय तत्त्वज्ञानालाच चपखलपणे लागू होतो, पाश्चात्य तत्त्वज्ञानाला नाही.

Department Of Philosophy, Sangamner College, Sangamner

---

[14] सत्याचे दर्शन घेणे म्हणजेच आपण स्वतःच तसे होणे, अशी भूमिका प्राचीन ग्रीक तत्त्वज्ञांचीही होती.उदाहरणार्थ प्लेटोच्या चैतन्यवादात अंतिम शिवतत्त्वाशी एकरूपता साधणे , सायुज्जता साधणे अपेक्षित आहे .अशा रितीने 'दर्शन ' ही संज्ञा अंतिम सत्याशी बौद्धिक आणि भावनिक नाते जोडते.या नात्याचा श्रीगणेशा साधकाच्या स्वतः सत्यात परिवर्तीत होण्यात आढळतो.

[15] Prof. S. S. Barlingay, "Reunderstanding Indian Philosophy", *Reunderstanding Indian Philosophy,* D. K. Printworld, New Delhi.